# देगलूर महाविद्यालयाच्या मनिषा वनंजेला विद्यापीठाचे लोकप्रशासन सुवर्णपदक

**देगलूर/प्रतिनिधी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाची विद्यार्थिनी मनिषा जळबाराव वनंजे ही विद्यापीठाच्या एम. ए. लोकप्रशासन विषयात गुणवत्ता यादीत सर्वप्रथम आली आहे.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात २ डिसेंबर २०२१ रोजी कुलगुरु डॉ. उद्धव भोसले व विशेष पोलीस महानिरीक्षक निसार तंबोळी यांच्या हस्ते मनिषा वनंजे यांना सुवर्ण पदक प्रदान करण्यात येणार आहे. प्रस्तुत सुवर्णपदक सौ. सुशीला मुरलीधर कठारे यांच्या नावाने असून डॉ. अनिल कठारे यांच्या वतीने ते दिले जाणार आहे.

यापुर्वीही या महाविद्यालयाचे लोकप्रशासन विभागाचे आठ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत. तसेच ११ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पूर्ण केली आहे. या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार , उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उनग्रतवार , देवेंद्र मोतेवार , गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे. चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, ऊपप्राचार्य निवृती गोविंदवार , पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर यांनी विद्यार्थीनी मनिषा वनजे , लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार व डॉ. संजय देबडे यांचे कौतूक केले आहे.

Scanned with CamScanner